NOVEMBER 2025 DBJ NEWSLETTER VOL. 3, ISSUE 12

Est. 1965

# DBJ NEWSLETTER

A Monthly Multilingual E-Newsletter of D.B.J. College, Chiplun
Dist. Ratnagiri (M.S.)

*Editors: Dr. S.P. More,
Mr. R.K. Dawane, Mrs. P.U. Katdare*




मा. मंगेशजी तांबे यांना ‘आदर्श शिक्षण संस्थाचालक’ पुरस्कार प्रदान

## LIMELIGHT

N.S.S. DEPARTMENT
GYMKHANA DEPARTMENT
CULTURAL DEPARTMENT
SPECIAL HONOUR
PHILANTHROPY
STAFF ACHIEVEMENTS
STAFF SUPERANNUATION
COLLEGE NEWS

## संपादकांचे मनोगत

नमस्कार वाचक मित्रहो !

दिवाळीच्या हर्ष-उल्हासी वातावरणानंतर नुकत्याच सुरु झालेल्या महाविद्यालयात विद्यार्थी आणि शिक्षक यांचा किलबिलाट पुन्हा चालू झालाय. लगेच परीक्षेचा माहोल देखील आहे. त्यामुळे तुलनेने कमी कालावधी मिळाल्याने मोजक्याच उपक्रमाच्या बातम्या देणारा हा अंक आपल्यासमोर सादर करतांना नेहमीचाच आनंद होत आहे.

या महिन्यातील सर्वात आनंदाची आणि विशेष गर्वाची बाब म्हणजे आपल्या नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे सन्मानीय चेअरमन श्री. मंगेशजी तांबे यांना लोकनेते स्व. वसंत डावखरे स्मृती प्रीत्यर्थ दिला जाणारा ‘वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक पुरस्कार-२०२५’ प्राप्त झाला. त्यांचा सन्मान खरोखर आपल्या सर्वांना गर्वाने सांगण्याजोगा आहे.

एन.एस.एस. या विभागाने दीपावलीच्या सुटीमध्ये चिपळूण शहर पोलीस स्टेशन तर्फे सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेली रॅली उल्लेखनीय ठरेल.

‘वंदे मातरम’ या राष्ट्रगीताला नुकतेच १५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्ताने महाविद्यालयात हे राष्ट्रगान सामुहिकपणे गायले गेले, त्याचीही काही क्षणचित्रे या अंकात आहेत.

पुणे येथील मानसशास्त्राचे १९९३ साली सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक डॉ. श्री. बोरुडे यांनी नवकोंकण एज्युकेशन सोसायटीला रु. चार लाखाचा चेक दिला. त्यांनी ही देणगी महाविद्यालयातील गरजू मुलींना त्यांच्या शिक्षणासाठी दिली आहे. या क्षणाचे छायाचित्र देखील या अंकात पाहायला मिळेल.

शेवटी, महाविद्यालयातील महत्वाच्या अशा प्रबंधक पदावरून आपला सेवाकाल पूर्ण करून निवृत्त झालेले श्री. अनिल कलकुटकी यांचा सत्कार सोहोळा तसेच नव-नियुक्त प्रबंधक श्री. विजयेंद्र जाधव यांना दिलेल्या शुभेच्छा यांनी हा अंक सजलेला आहे यात शंका वाटत नाही.

धन्यवाद....

# N.S.S. Department

## सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त मेळावा




चिपळूण शहर पोलीस स्टेशन तर्फे सरदार वल्लभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये डी.बी.जे. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी

## NDTV चे प्रतिनिधींचे विद्यार्थ्यांसोबत हितगूज करुन संवाद






महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय छात्र सेना व तृतिय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांनी दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये सायंकाळी ०५.३० वाजता "चिपळूण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांकडून मतदारांच्या अपेक्षा" या विषयावर NDTV चे प्रतिनिधीनी विद्यार्थ्यांसोबत हितगूज करुन संवाद साधला. यावेळी NDTVचे मुंबईचे प्रतिनिधी श्री. अक्षय कुडकेलवार, कॅमेरामन श्री. गौरव नाईक, श्री. राकेश गुडेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव बापट, रजिष्ट्रार श्री. विजय जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. ज्ञानोबा कदम उपस्थित होते.

# N.S.S. Department

## ‘वंदे मातरम’ या गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त सामूहिक संपूर्ण ‘वंदे मातरम’ गीताचे गायन






# Gymkhana Department




दिनांक 31 ऑक्टोबर ते 02 नोव्हेंबर 2025  चालू असलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत 10 km चालणे स्पर्धेत कु. रोहन केतकर (SY. IT )याने सुवर्ण पदक प्राप्त केले.

# Cultural Department




🎭 माळरान प्रॉडक्शन आयोजित 🎭
Embryonic Fertility & IVF Centre
Present

---

🏆चांडाळ चौकडी हास्य करंडक🏆
(राज्यस्तरीय स्किट स्पर्धा 2025)

---

स्पर्धक क्र. 02
"डी बी जे कॉलेज चिपळूण"
स्किट : यंदा कर्तव्य आहे

---

लिंक
https://youtu.be/b3ndFBhi3pk?si=twmQaUxDM3wp4WEi

---

सदर स्पर्धा "30 ऑक्टोबर 2025" रोजी "भरत नाट्य मंदिर, पुणे" याठिकाणी पार पडली.

# HONOUR

## मा . मंगेशजी तांबे यांना आदर्श शिक्षण संस्थाचालक पुरस्कार प्रदान



शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या येथील नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. मंगेश तांबे यांना वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक पुरस्कार प्राप्त झाला. त्याचे वितरण ठाणे येथे झाले. वसंतस्मृती आदर्श शिक्षक संस्थाचालक पुरस्कारासाठी नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. तांबे यांची निवड करण्यात आली होती. जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात नवकोकण एज्युकेशन सोसायटी हे अग्रगण्य नाव आहे.

या संस्थेच्या माध्यमातून श्री. मंगेश तांबे हे डीबीजे महाविद्यालयाच्या शिक्षण क्षेत्रात मोलाचे काम करत आहेत. शिक्षणासाठीचा मानबिंदू म्हणून या महाविद्यालयाकडे पाहिले जाते. त्यातून विद्यार्थ्यांची संस्थेच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक उपक्रम राबवण्यात येत आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे मार्गदर्शक श्री. मंगेशजी तांबे हे या संस्थेमध्ये २०१० पासून कार्यरत आहेत त्यांच्या कारकिर्दीत महाविद्यालयामध्ये चिपळूण शहरातील विध्यार्थ्यांना कॉम्प्युटरचे Data science, BAF, संशोधक निर्माण होण्यासाठी संशोधन प्रयोगशाळा उपलब्ध करून दिल्या तसेच अनेक नवीन कोर्सेस सुरु केले. या शिक्षणाची उपलब्ध करून देण्यासाठी अविरतपणे झटणारे आणि एकमेव काम करणारे मंगेशजी तांबे यांना या वर्षीचा वसंत पुरस्कार देऊन या पुरस्काराची उंची वाढवाणरी आहे व ते कोकण विभागातील पहिले संस्थाचालक असावेत. महाविद्यालय हे स्वायत्त व्हावे व नवनवीन स्किल ओरिएंटेड विध्यार्थी घडावेत ही त्यांची मनीषा आहे.

# Special Philanthropy

## विशेष दातृत्व



पुणे येथील मानसशास्त्राचे १९९३ साली सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक डॉ. श्री. बोरुडे यांनी नवकोंकण एज्युकेशन सोसायटीला रु. चार लाखाचा चेक दिला. त्यामध्ये त्यांच्या देणगीच्या अटीनुसार प्रशासकीय खर्च वजा जाता उर्वरित व्याजाची रक्कम गरजू मुलींना की जे एक पालक आहेत अशा मुलींना व्याजातून दरवर्षी शिष्यवृत्ती द्यावी. शिष्यवृत्तीचे नाव त्यांचे जेष्ठ बंधू स्वातंत्र्यसैनिक स्वर्गीय भानुदास रखमाजी बोरुडे व स्वर्गीय लक्ष्मीबाई भानुदास बोरुडे, अहिल्यानगर असे असेल. संस्थेचे पदाधिकारी श्री. अविनाश जोशी यांनी देणगीचा चेक पुणे येथे स्विकारला. सोबत त्याचे जावई डॉ. मधुकर अडसुळ व ज्येष्ठ कन्या डॉ. सुनिता अडसुळ.

# STAFF ACHEIVEMENT

## डीबीजे महाविद्यालयाच्या प्रबंधकपदी विजयेंद्र जाधव यांची नियुक्ती




नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालययाचे प्रबंधक श्री. अनिल कलकुटकी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. यामुळे या रिक्त झालेल्या प्रबंधक पदावर महाविद्यालयातील विजयेंद्र जाधव यांची नियुक्ती करण्यात आली. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

विजयेंद्र जाधव हे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून गेली ३० वर्ष महाविद्यालयात सेवेत आहेत. मागील तीन वर्षापासून त्यांनी कार्यालय अधीक्षक म्हणून काम पाहिले आहे. कार्यालयीन कामकाजाचा त्यांना दांडगा अनुभव आहे. कामात तत्परता,अचूकता, आणि कामाचा पाठपुरावा करणे असे विशेष श्री. जाधव यांचे सांगता येतील. प्रबंधक पदी निवड झाल्याबद्दल श्री.जाधव यांनी संस्थेचे व महाविद्यालयीन प्रशासनाचे आभार मानले.

या नियुक्ती बद्दल संस्थेचे चेअरमन मंगेश तांबे, पदाधिकारी, प्राचार्य डॉ. माधव बापट, उपप्राचार्य डॉ. आर.एम.मोरे, उपप्राचार्य डॉ .चेतन आठवले, कनिष्ठ महाविद्यालयीन उपप्राचार्य प्रा.सौ स्नेहल कुलकर्णी, पर्यवेक्षिका प्रा.सौ.सुजाता खोत, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# STAFF SUPERANNUATION

## महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. अनिल कलकुटकी यांची सेवानिवृत्ती










डीबीजे महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. अनिल कलकुटकी आपल्या ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवापूर्ती सदिच्छा कार्यक्रम महाविद्यालयाच्या पटांगणात आयोजित करण्यात आला. यावेळी श्री. व सौ. कलकुटकी यांना शुभेच्छा देण्यासाठी मंचावर न.ए.सोसायटीचे सचिव श्री. अतुल चितळे, खजिनदार श्री. संजीव खरे तसेच प्राचार्य डॉ. माधव बापट, उप-प्राचार्य डॉ. आर.एम. मोरे, डॉ. चेतन आठवले, नूतन प्रबंधक श्री. विजयेंद्र जाधव आदि उपस्थित होते.

या कार्यक्रमाला श्री. कलकुटकी यांचे सर्व आप्तेष्ट, मित्र-मंडळी, महाविद्यालयातील सर्व आजी-माजी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग आणि शहरातील विविध क्षेत्रातील नागरिक आवर्जून उपस्थित होते. या सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. विनायक बांद्रे यांनी केले.

# DBJ NEWS

**दैनिक नवराष्ट्र , ०९/११/२५**

## मंगेश तांबे ठरले आदर्श शिक्षण संस्थाचालक

### नवकोंकण एज्युकेशन सोसायटीतर्फे गौरव

▶ चिपळूण (वा.) शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे यांना वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार प्रदान सोहळा ९ नोव्हेंबर सकाळी ९.३० वाजता बँक्वेट हॉल, एस. एच. हायस्कूल शिवाजी पथ, ठाणे (पश्चिम) येथे होणार आहे. जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात नवकोंकण एज्युकेशन सोसायटी हे अग्रगण्य नाव आहे. या संस्थेच्या माध्यमातून डीबीजे महाविद्यालय शिक्षण क्षेत्रात मोलाचे काम करीत आहे.

### लोकनेते वसंत डावखरेंच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार



भारतीय जनता पार्टीतर्फे (शिक्षण आघाडी) कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी उपसभापती लोकनेते स्व. वसंत डावखरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ वसंतस्मृती आदर्श शिक्षक संस्थाचालक पुरस्कार-२०२५ करता नवकोंकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन तांबे यांची निवड करण्यात आली आहे. शिक्षणासाठीचा मानबिंदू म्हणून या महाविद्यालयाकडे पाहिले जाते. त्यातून विद्यार्थ्यांची संस्थेच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक उपक्रम राबवण्यात आले असून जडणघडण झाली आहे. अशी शैक्षणिक क्षेत्रात छाप सोडणाऱ्या नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन तांबे यांना संस्थाचालक म्हणून प्राप्त झालेल्या पुरस्कारबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

CMYK

## मंगेश तांबेंना वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक पुरस्कार

चिपळूण

शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन मंगेश तांबे यांना वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार प्रदान सोहळा ९ नोव्हेंबर सकाळी ९.३० वाजता बँक्वेट हॉल, एस. एच. हायस्कूल शिवाजी पथ, ठाणे (पश्चिम) येथे होणार आहे.

भारतीय जनता पार्टीतर्फे (शिक्षण आघाडी) कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी उपसभापती लोकनेते स्व. वसंतराव डावखरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ वसंतस्मृती आदर्श शिक्षक संस्थाचालक पुरस्कार-२०२५ करता नवकोंकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन



तांबे यांची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात नवकोंकण एज्युकेशन सोसायटी हे अग्रगण्य नाव आहे. या संस्थेच्या माध्यमातून डीबीजे महाविद्यालय शिक्षण क्षेत्रात मोलाचे काम करीत आहे. शिक्षणासाठीचा मानबिंदू म्हणून या महाविद्यालयाकडे पाहिले जाते.

संस्थेच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक उपक्रम राबवण्यात आले असून त्यातून विद्यार्थ्यांची जडणघडण झाली आहे. अशी शैक्षणिक क्षेत्राती छाप सोडणाऱ्या नवकोकण एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन तांबे यांना संस्थाचालक म्हणून प्राप्त झालेल्या पुरस्कारबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**दैनिक सागर , १२/११/२५**

## डीबीजेच्या प्रबंधकपदी विजयेंद्र जाधव

चिपळूण : येथील नवकोंकण एज्युकेशन सोसायटीच्या डीबीजे महाविद्यालययाचे प्रबंधक श्री अनिल कलकुटकी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.यामुळे या रिक्त झालेल्या प्रबंधक पदावर महाविद्यालयातील श्री.विजयेंद्र जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

विजयेंद्र जाधव हे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून गेली ३० वर्ष महाविद्यालयात सेवेत आहेत. मागील तीन वर्षापासून कार्यालय अधीक्षक म्हणून काम



विजयेंद्र जाधव

पाहिले आहे. असा कार्यालयीन कामकाजाचा त्यांना दांडगा अनुभव आहे. कामात तत्परता, अचूकता आणि कामाचा पाठपुरावा करणे असे विशेष श्री. जाधव यांचे सांगता येतील. प्रबंधकपदी निवड झाल्याबद्दल श्री.जाधव यांनी संस्थेचे व महाविद्यालयीन प्रशासनाचे आभार मानले.

या नियुक्ती बद्दल संस्थेचे चेअरमन मंगेश तांबे, पदाधिकारी, प्राचार्य डॉ. माधव बापट, उपप्राचार्य डॉ. आर.एम.मोरे, उपप्राचार्य डॉ.चेतन आठवले, कनिष्ठ महाविद्यालयीन उपप्राचार्य प्रा.सौ स्नेहल कुलकर्णी, पर्यवेक्षिका प्रा.सौ.सुजाता खोत, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# DBJ NEWS

**दैनिक सागर , ०६/११/२५**

## मैत्रीच्या दुनियेतील राजा माणूस : अनिल कलकुटकी

डी. बी. जे. महाविद्यालयाचे प्रबंधक श्री. अनिल पुरंदर कलकुटकी हे ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्त हा शब्दप्रपंच...

कविवर्य मंगेश पाडगावकरांची एक सुंदर रचना आहे.

कोलाहलात साऱ्या माणूस शोधतो मी,

माणसांच्या गर्दीत या माणूस शोधतो मी

आजच्या गतीशील आणि धकाधकीच्या जीवनात सर्वस्व मिळवूनही माणूस मात्र माणुसकी विसरत चालला आहे. अशा माणसांच्या गर्दीत काही व्यक्ती अशा असतात की, ज्या केवळ बुद्धिमतेने नव्हे, तर आपुलकीने आपल्या हसऱ्या स्वभावाने आणि मनमिळावू मैत्रीच्या धाग्याने सर्वांच्या ह्रदयात घर करतात. असे डी. बी. जे. महाविद्यालयाचे प्रबंधक माझे मित्र श्री. अनिल कलकुटकी म्हणजे मैत्रीच्या दुनियेतील राजा माणूस!

माणसाच्या जीवनात सर्वांग सुंदर नातं कोणतं असेल तर ते मित्रत्वाचे ! विधात्याने दिलेली सर्वश्रेष्ठ देणगी म्हणजे मित्रत्व होय. आपले आई-वडील, बहिण-भाऊ, ही नाती निसर्गदत्त आपल्याला मिळतात. ती आपल्या हातात नसतात. मात्र मित्राचं नातं आपण निर्माण करतो. ते पूर्णपणे भावनिक असते. त्या नात्याला इतर नात्याप्रमाणे व्यवहाराचा जराही स्पर्श नसतो. ते निर्व्याज प्रेम असते. वि. स. खांडेकर लिहितात, रक्ताच्या नात्यापेक्षा भावनेचे नातं अधिक दृढ असते. ते मित्राचं असते. सुखाच्या वाटेवर सगळेच सोबती असतात. दुःखाच्या वळचणीला आपल्या सोबतीला कोणी उभं राहात नाही. जो ठाम पणे उभा राहातो तो मित्र ! मित्र वणव्यामध्ये गारव्या सारखा या फे ममध्ये चपखलपणे बसणारे व्यक्तिमत्व म्हणजे माझे मित्र श्री अनिल कलकुटकी!

वक्तृत्व फारसे नाही वक्तृत्वात नसलेला गोडवा शब्दात मात्र ठासून भरला आहे. यामुळेच महाविद्यालयातील प्रत्येक जण अनिलमय झाले.

मुळात महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी यामुळे प्रथमपासूनच इथल्या मातीशी आणि माणसांची नाळ जोडलेली. प्रयोगशाळा सहाय्यक ते प्रबंधक हा प्रवास विलक्षण आहे. विद्यालयाच्या प्रत्येक विभागाशी इथल्या प्रत्येकाशी ते जोडले गेले आहेत. जे काम होईल ते समोर सांगणार. जे नाही होणार ते करण्याचा आटोकाट प्रयत्न करणार. पोटात एक आणि ओठात एक हा स्वभाव नाही. आपले कर्मचारी कसे सांभाळावे हे त्यांच्याकडून शिकावे.



चांगले काम केले. तर गौरवाचे गोड शब्द निघतात. पण एखादा चुकला तर अनुशासनाचा गंभीर शब्द निघाल्याखेरीज राहात नाही. कलकुटकी यापेक्षा वेगळे. अडचणीच्या काळात तेच धीर देणार, चुकल्यावर ओरडणार, पण त्याचक्षणी सावरणारे ही तेच! यामुळे विश्वासाचे नाते निर्माण झाले.

पदावर विराजमान झाल्यावरही वरिष्ठांना ते कधीही विसरले नाहीत. आजही आपल्या निवृत्त सहकाऱ्यांशी तितक्याच चांगल्या प्रकारचा सलोखा राखून आहेत. नव्या कर्मचाऱ्यांशीही तितकेच आपुलकीने वागतात. म्हणून म्हणावेसे वाटते. कलकुटकी म्हणजे जुन्या-नव्या सहकारी पिढींचा मध्यवर्ती केंद्रबिंदू आहे.

महाविद्यालयाला प्रबंधकांची फार मोठी परंपरा आहे. बागेवाडी हे पहिले प्रबंधक यानंतर श्री. विजय सावंत हे एका विचाराने आणि समर्पणशील भावनेने कार्यालय जोपासणारे होते. ही परंपरा अनिलजींनी पुढे राखली. सेवानिवृत्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पेन्शनचे काम सेवानिवृत्तीच्या पूर्वी कसे पूर्ण होईल, याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांना यश देखिल प्राप्त झाले.

आपण जगामध्ये मित्र शोधतो. त्यानी मित्रांमध्ये जग शोधले आणि आपल्या वर्गमित्रांचा एक मैत्री ८५ ग्रुप स्थापन केला. यामाध्यमातून गेटटुगेदर, फिरणे मौज मजा. एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे. हे सुरु केले. पण इतकेच मर्यादित न ठेवता. त्या मैत्रीला सामाजिकतेची किनार दिली. यातून सामाजिक काम सुरु झाले. गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक साहित्य, कोरोनाकाळात वयोवृद्? व निराधार कुटुंबाना धान्य वाटप याच कोरोना काळात एका कोरोना सेंटरला रूग्णाना अत्यावश्यक असलेली दोन मशीन देणे, भारतीय समाजसेवा केंद्र येथील अनाथ बालकाश्रमात इन्व्हर्टर देखिल मिळवून देण्यास पुढाकार घेतला.

दुसऱ्याचे दुःख आपण घेऊ शकत नाही. पण निदान त्यावर फुंकर घालण्याचे काम तरी करू शकतो. दैनंदिन जीवनात आपण आपल्याच विश्वात मश्गुल असतो. आपण सण साजरे करतो. काही माणसे मात्र यापासून वंचित राहतात. म्हणून दरवर्षी दिवाळीच्या पूर्वसंध्येला आदिवासी, कामकरी पाड्यामध्ये दिवाळी फराळ, कपडे देऊन दिवाळी त्यांच्यासोबत साजरी करतात. दुसऱ्याच्या आयुष्यात आनंद निर्माण करणे या सारखे आणखी आनंददायी काय असू शकेल?

या सगळ्या बाबत प्रसिध्दीचा अजिबात हव्यास नाही. या सेवेचे बाळकडू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेने दिले असे ते अभिमानाने सांगतात. कै. डॉ. क्षेमाताई थत्ते, प्राचार्य कै. भीमशेन कवलगी, श्री. विजय सावंत, कै. अरुण शहाणे, डॉ. प्रकाश मिरगल, डॉ. प्रमोद मिरगल, श्री. अनिलशेठ दाभोळकर, नितीन मेहता, श्री. दत्ताराम शिंदे, डॉ. संतोष ढगे, डॉ. मुस्ताक मुकादम, चेअरमन श्री. मंगेश तांबे, खजिनदार श्री. संजीव खरे आणि मित्र परिवार, आई-वडील यांच्याबद्दल भरभरुन कृतज्ञता व्यक्त करतात.

संघटनात्मक कार्याचा देखिल आवर्जून उल्लेख करावा लागेल. माणस जोडणाऱ्या माणसासाठी हे कठीण नव्हते, मात्र व्यक्ति तितक्या प्रकृती यामुळे संघटना जोपासणे, वाढविणे तसे कठीण होते. मात्र कै. आर. बी. सिंह यांच्या खांद्याला खांदा लावून अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची बांधणी संपूर्ण महाराष्ट्रात केली. जवळपास २१ वर्षे या संघटनेचे उपाध्यक्ष पद सांभाळले. तसेच महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन कर्मचारी महासंघाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पद देखिल भूषविले.

महाराष्ट्र शासनाकडून विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांची निवड करण्यात आली. आतापर्यंतच्या प्रवासात अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यामध्ये २०१०-११ चा अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचा कर्मचारी भूषण पुरस्कार कार्यालयातील उत्कृष्ट कामगिरीसाठी आदर्श कर्मचारी पुरस्कार २०२० ला. कोविड योध्दा मुंबई विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष १९-२० चा गुणवंत कर्मचारी पुरस्कार, जनता दल चिपळूण यांच्या तर्फे जनसेवक पुरस्कार २०२३, तर इंडियन स्टुडंट कौन्सिलच्यावतीने राजश्री छत्रपती शाहू महाराज पुरस्काराने त्याना सन्मानित करण्यात आले आहे.

हे सारे करताना कौटुंबिक जबाबदारी देखिल पार पाडली. या सगळ्या प्रवासात पत्नी – सौ. सुनिता, मुलगा ओंकार, मुलगी तन्वी यांची उत्तम साथ लाभली आहे.

अनिलजी, आज ३६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त होत आहात. आयुष्यात नवीन पान आपल्यासाठी तयार आहे. आता मैत्रीच्या नात्यांची गुंफण अधिक घट्ट होईल. त्याला अधिक सामाजिकतेची व सार्वजनिकतेची जोड मिळेल. खरी मैत्री ही कधीही संपत नाही. काळाच्या ओघात ती अधिक दृढ होते. अनिलजींचा उत्साह, वातावरण भारावून टाकणारा असतो. ना. सी. फडके म्हणतात खरा मित्र सूर्यासारखा असतो त्याच्या सानिध्यात असताना प्रकाशात असण्याचा भरवसा आपल्या मनाला वाटत असतो. अडचणीला सामोरे जाण्याचे बळ देतो. आनंदाचे क्षण अधिक अर्थपूर्ण करतो. तो मैत्रीचे मोल जाणतो म्हणूनच तो मैत्रिच्या दुनियेतील राजा माणूस ठरतो.

असा खरा मित्र सगळ्यानांच मिळतो असे नाही तो. शोधला तर सापडत नाही. वाट पाहिली म्हणून मिळेल असं नाही. तो कस्तुरी मृगासारखा सुंगधी पण दुर्मिळ असतो. ज्याला मिळतो तो भाग्यवान! असा एक मित्र माझ्या गाठीशी आहे याचे विलक्षण समाधान आहे. माझ्या मित्राचे पुढील आयुष्य आरोग्यदायी निरामय जावो या मनापासून शुभेच्छा!

– प्रा. विनायक बांद्रे,
डी.बी.जे. महाविद्यालय,
चिपळूण

**दैनिक सागर , ०७/११/२५**

## कार्य कुशल व्यक्तिमत्व : अनिल कलकुटकी

१५ नोव्हेंबर १९८९ रोजी नवकोकण एज्युकेशन सोसायटीच्या डी.बी.जे महाविद्यालयात अनिल कलकुटकी रुजू झाले. यांचे महाविद्यालयीन जीवनातच नेतृत्व व संघटक हा पिंड असल्यामुळे अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचे डी.बी.जे महाविद्यालयाचे युनिट प्रमुख म्हणून काम पाहिले. महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेत अनेक प्रश्नांना वाचा फोडून कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. संघटनेला रत्नागिरी जिल्ह्यापासून तर मुंबई विद्यापीठ मुंबईपर्यंत बळ व संघटना वाढवण्याचे काम केले आहे. संघटनात्मक कार्य हे त्यांच्या सेवेच्या काळात खूप महत्वाचे आहे. मानसे जोडणाऱ्या मानसासाठी हे कठीन नव्हते, मात्र व्यक्ती तितक्या प्रकृती यामुळे संघटना जोपासने, वाढविणे तसे कठीण होते. कामगार नेते कै. आर. बी. सिंह यांच्या खांद्याला खांदा लावून अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची बांधनी संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यात केली. जवळपास २१ वर्ष या संघटनेचे उपाध्यक्ष पद सांभाळले. तसेच महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन कर्मचारी महासंघाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पद देखिल भूषविले.

कॉलेजच्या युनिट प्रमुखांपासून महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्ष पदांपर्यंत मजल मारलेली आहे हे सर्व त्यांच्या नेतृत्व गुणांमुळे आणि व्यापक दृष्टिकोनामुळे झालेलं दिसून येते. अशासकिय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचे सहसचिव म्हणून तीन वर्ष काम केले उपाध्यक्ष म्हणून २१ वर्ष संघटनेची पुरा सांभाळलेली आहे. अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघ २८ वे जानेवारी २००६ या वर्षी अधिवेशन डी बी जे महाविद्यालय चिपळूण येथे यशस्वी पणे पार पाडले. महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघ १२ वे त्रैवार्षिक अधिवेशन दिनांक २७ व २८ ऑक्टोबर २०१८ डी.बी.जे महाविद्यालयात भव्य प्रांगणात पार पाडले. सदर अधिवेशनाचे संयोजकाचे काम करत असताना त्यांना खेर्डीचे माजी सरपंच श्री दशरथ दाभोळकर, विनायक बांद्रे यांचे सहकार्य लाभले.



मुळात महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी यामुळे प्रथमपासूनच इथल्या मातीशी आणि मानसांची नाळ जोडलेली. प्रयोगशाळा सहाय्यक ते प्रबंधक हा प्रवास विलक्षन आहे. विद्यालयाच्या प्रत्येक विभागाशी इथल्या प्रत्येकाशी ते जोडले गेले आहेत. जे काम होईल ते समोर सांगणार, जे नाही होणार ते करण्याचा आटोकाट करणार, पोटात एक आणि ओठात एक हा स्वभाव नाही. आपले कर्मचारी कसे सांभाळावे हे त्यांच्याकडून शिकावे, चांगले काम केले. तर गौरवाचे गोड शब्द निघतात. पन एखादा चुकला तर अनुशासनाचा गंभीर शब्द निघाल्याखेरीज राहात नाही. कलकुटकी यापेक्षा वेगळे. अडचणीच्या काळात तेच धीर देणार, चुकल्यावर ओरडणार, पण त्याचक्षणी सावरणारे ही तेच! यामुळे विश्वासाचे नाते निर्माण झाले.

महाविद्यालयाला प्रबंधकांची फार मोठी परंपरा आहे. बागेवाडी हे पहिले प्रबंधक यांनतर श्री. विजय सावंत हे एका विचाराने आणि समर्पणशील भावनेने कार्यालय जोपासणारे होते. ही परंपरा अनिल कलकुटकी यांनी पुढे राखली. सेवानिवृत्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पेन्शनचे काम सेवानिवृत्तीच्या पूर्वी कसे पूर्ण होईल, याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांना यश देखिल प्राप्त झाले.

मी समाजाचे काही तरी देणे लागतो म्हणून वाडी वस्ती पाड्यावर जाऊन निराधार कुटुंबाना धान्य वाटप करतात, देशभरात कोरोनाची लाट पसरली तेव्हा खूप मदत केली. आपण सण साजरे करतो. काही मानसे मात्र यापासून वंचित राहातात. म्हणून दरवर्षी दिवाळीच्या पूर्वसंध्येला आदिवासी, कामकरी पाड्यामध्ये दिवाळी फराळ, कपडे देऊन दिवाळी त्यांच्यासोबत साजरी करतात. दुसऱ्याच्या आयुष्यात आनंद निर्माण करणे या सारखे आनखी आनंददायी काय असू शकेल? माहापुराच्या काळात डोक्याला हात न लावता गोरगरिबांना मदत करण्याचे काम केले आहे या सेवेचे बाळकडू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेने दिले असे ते अभिमानाने सांगतात. कै. डॉ. क्षेमाताई थत्ते, प्राचार्य कै. भीमशेन कवलगी, श्री. विजय सावंत, अरुण शहाणे, कै डॉ. प्रकाश मिरगल, डॉ. प्रमोद मिरगल, श्री. दशरथ दाभोळकर, नितीन मेहता, श्री. दत्ताराम शिंदे, डॉ. संतोष ढगे, डॉ. मुस्ताक मुकादम, चेअरमन श्री. मंगेश तांबे, खजिनदार श्री. संजीव खरे प्राचार्य माधव बापट, मैत्री ८५ ग्रुप आणि मित्र परिवार, आई-वडील, भाऊ-बहीण यांच्याबद्दल भरभरुन कृतज्ञता व्यक्त करतात.

महाराष्ट्र शासनाकडून विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांची निवड करण्यात आली. आतापर्यंतच्या प्रवासात अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यामध्ये २०१०-११ चा अशासकीय महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघाचा 'कर्मचारी भूषण 'पुरस्कार कार्यालयातील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'आदर्श कर्मचारी' पुरस्कार २०२० ला. 'कोविड योद्धा' मुंबई विद्यापिठाचा शैक्षणिक वर्ष १९-२० चा 'गुणवंत कर्मचारी' पुरस्कार, जनता दल चिपळूण यांच्यातर्फे शिक्षक आमदार मा. कपिल पाटील यांच्या हस्ते 'जनसेवक' पुरस्कार २०२३, तर प्रशासकीय क्षेत्रातील इंडियन स्टुडंट कौन्सिलच्यावतीने राज्यस्तरीय 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज' पुरस्काराने त्याना सन्मानित करण्यात आले आहे.

अनिल कलकुटकी यांनी अविरतपणे सामाजिक व शैक्षणिक कार्य केले आहे यामुळे ते आपल्या क्षेत्रात यशस्वी झालेत. महाविद्यालयाचे, समाजाचे नाव उज्वल केले व यापुढे ही त्यांच्या हातून असेच समाजसेवेचे व शैक्षिनिक कार्य घडावे आणि स्विकारलेली जबाबदारी ते चोखपणे बजावतील ही अपेक्षा आहे. पुढील आयुष्य आरोग्यदायी निरामय जावो या मनापासून शुभेच्छा!

– प्रा. डॉ. ज्ञानोबा कदम
इतिहास विभाग
डी.बी .जे महाविद्यालय चिपळूण